महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील अंक...
साप्ताहिक
RNI : MAH/MAR/2011/40762
पोस्टल नंबर : MCW/354/2021-23

# धगधगती मुंबई

website:www.dhagdhagtimumbai.in
E-mail : dhagdhagtimumbai@gmail.com

वर्ष : १५ अंक : ५२, संपादक - भिमराव हिंदुराव धुळप मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२६ ते १६ फेब्रुवारी २०२६ पाने : ४ मूल्य : २ रुपये

# धगधगती मुंबईच्या 16 व्या वर्धापनदिनानिमित्त भव्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा; 2026 चे पुरस्कार जाहीर

## जेष्ठ पत्रकार अजित जगताप यांना जीवन गौरव पुरस्कार तर सिनेअभिनेते विजय पाटकर, योगेश चिकटगावकर, के.के.शेलार,रमेश कदम यांचाही पुरस्कारांमध्ये समावेश

नवी मुंबई (ओमकार धुळप): धगधगती मुंबई वृत्तपत्राच्या १६ व्या वर्धापनदिनानिमित्त राज्यस्तरीय विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा पुरस्कार सोहळा तसेच नवप्रेरणा कर्तृत्ववान महिला सन्मान सोहळा शनिवार दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत स्वर्गीय अण्णासाहेब पाटील सभागृह, सेक्टर ४–५, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

धगधगती मुंबई हे वृत्तपत्र गेली सोळा वर्षे अखंडपणे जनतेच्या न्यायहक्कासाठी लढणारे माध्यम म्हणून कार्यरत आहे. मुद्रित वृत्तपत्रासह यूट्यूब चॅनल व ऑनलाईन वेब पोर्टलच्या माध्यमातून सोशल मीडियावर वेगळे वलय निर्माण करत सर्वसामान्यांचा आवाज म्हणून धगधगती मुंबई ओळख निर्माण करत आहे.

या वृत्तपत्राच्या माध्यमातून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान दिले जात असून महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून मुंबईत उपचारासाठी येणाऱ्या गोरगरीब रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मिळवून देणे, उपचारादरम्यान रुग्णालयीन सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच अनाथाश्रम व वृद्धाश्रमांमध्ये दरवर्षी दोन ते तीन वेळा अन्नदान व वस्त्रदानाचे कार्यक्रम राबविले



जात आहेत. हे सर्व सामाजिक कार्य वाचक, जाहिरातदार व हितचिंतकांच्या सहकार्यामुळेच शक्य होत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

दरम्यान, धगधगती मुंबई २०२६ राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सातारा जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार अजित जगताप यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

सामाजिक सेवेबद्दल समाजरत्न पुरस्कार धारावीचे समाजसेवक रमेश कदम, समाजभूषण पुरस्कार उन्नतीचे चेअरमन हनुमंत रांजणे आणि कोपरखैरणे येथील समाजसेवक वसंत जाधव (सर) यांना जाहीर झाला आहे.

शैक्षणिक रत्न पुरस्कार प्रताप महाडिक, साहित्यरत्न पुरस्कार डॉ. शांताराम कारंडे, युवा राजकीय रत्न पुरस्कार नवनिर्वाचित नगरसेवक गणेश सकपाळ (घणसोली), उद्योगरत्न पुरस्कार सौ. अनुजा कौतिक दांडगे (महाराष्ट्र बाजार पेठ) तसेच उद्योजक के. के. शेलार यांना देण्यात येणार आहे.

वैद्यकीय रत्न पुरस्कार नवी मुंबईतील प्रसिद्ध हाडवैद्य डॉ. सचिन वरखडे आणि एमबीबीएस डॉ. सुरज प्रकाश पाटील यांना जाहीर झाला आहे.

कलाक्षेत्रातील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेते विजय पाटकर यांना कलारत्न पुरस्कार तर लोककलावंत योगेश चिकटगावकर यांना कला गौरव पुरस्कार देण्यात येणार आहे.

कायद्याच्या क्षेत्रातील योगदानासाठी नवी मुंबईतील ॲड. मनीषा योगेश चव्हाण यांना कायद्यारत्न पुरस्कार, सहकार क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल मुंबई बँकेचे संचालक नंदकुमार काटकर यांना सहकारत्न पुरस्कार, तर दलित मित्र पुरस्कार मुंब्रा-ठाणे येथील ज्येष्ठ नगरसेवक राजन नारायण कीने यांना जाहीर करण्यात आला आहे.

तसेच उत्कृष्ट संस्था म्हणून सुका व ओला कचरा वेगळा करून कचरा व्यवस्थापनाबाबत समाजप्रबोधन करणाऱ्या संगम प्रतिष्ठान या संस्थेलाही सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय नवरात्री उत्सव काळात DDM न्यूजच्या माध्यमातून पॉडकास्ट घेतलेल्या नऊ कर्तृत्ववान महिलांचा विशेष सन्मान या सोहळ्यात करण्यात येणार आहे.

सदर सर्व पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते नवी मुंबई येथे आयोजित भव्य कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहेत.

**धगधगती मुंबई प्रस्तुत - नवरात्री प्रेरणा ( विशेष सन्मान )**

1. ॲड. स्मिता चिपळूणकर ( कायदेविषयक सल्लागार )
2. रेणुका सोनवणे ( महिला बचत गट)
3. डॉ. ज्योतीताई गायकवाड (आमदार, धारावी विधानसभा )
4. दिव्या ढोले ( अध्यक्षा,संकल्प सिद्धी ट्रस्ट)
5. मानसी पोळ ( उद्योजिका, एस नॅपकिन बुफे)
6. सौ. स्वाती माने होलमुखे ( मुख्याध्यापिका, राजे शिवाजी विद्यालय,धारावी)
7. राधिका महाकाळ ( रस्ते सुरक्षा दल मुंबई महिला अध्यक्ष )
8. सौ.भारती प्रकाश पाटील ( कर्तुत्वान महिला (गृहिणी))
9. प्रिया शिंदे ( अध्यक्षा,संस्कृती उत्सव नवी मुंबई )

# मुंबई महापौरपदी रितू तावडे, उपमहापौरपदी संजय घाडी; ११ फेब्रुवारीला अधिकृत घोषणा

**मुंबई (भीमराव धूळप ) :** मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदी रितू तावडे, तर उपमहापौरपदी संजय घाडी यांची निवड निश्चित झाली असून, याबाबतची अधिकृत घोषणा मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या विशेष सभेत या निवडीची औपचारिक घोषणा होणार आहे.



महापौर व उपमहापौर निवडणुकीच्या प्रक्रियेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे ही निवड बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, महापालिकेच्या सत्ताकारणात नव्या समीकरणांची चर्चा रंगली आहे.

महापौरपदासाठी रितू तावडे यांच्या नावावर एकमत झाले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली नागरी सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण व वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाणार आहे. पर्यावरणपूरक विकास आणि नागरिक-केंद्रित कारभार हेही त्यांच्या प्राधान्यक्रमात असणार आहेत.

उपमहापौर संजय घाडी यांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमध्ये समन्वय साधून प्रलंबित विकासकामांना गती देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण आणि पारदर्शक कारभारावर भर दिला जाणार आहे.

११ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या अधिकृत घोषणेकडे मुंबईकरांचे लक्ष लागले असून, नव्या नेतृत्वाकडून मुंबईच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आता मुंबईतच घरे हवीत!

## १४ कामगार संघटनांचा १० मार्च रोजी विधानभवनावर धडक मोर्चा..

**मुंबई (भीमराव धुळप) :** गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नावर सरकारकडून देण्यात आलेल्या आश्वासनांची अद्याप अंमलबजावणी न झाल्याने कामगारांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर परेल येथे पार पडलेल्या १४ कामगार संघटनांच्या गिरणी कामगार संयुक्त लढा समितीच्या बैठकीत येत्या १० मार्च रोजी सकाळी ११ वाजता विधानभवनावर धडक मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष व लढा समितीचे प्रमुख आमदार सचिनभाऊ अहिर होते. गिरणी कामगारांना आता मुंबईतच घरे मिळाली पाहिजेत, ही प्रमुख मागणी या आंदोलनातून लावून धरली जाणार असून या प्रश्नावर विधानसभेतही आवाज उठवण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

९ जुलै रोजी विधानभवनावर झालेल्या आंदोलनानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक आश्वासन दिले होते. मात्र त्याची पूर्तता न झाल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली. दरम्यान, १५ मार्च २०२४ च्या अध्यादेशातील कामगारविरोधी १७ वे कलम रद्द झाल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

बंद एनटीसी गिरण्यांच्या जागा, मिठागरांची जमीन, बीडीडी चाळ पुनर्वसन, ट्रान्झिट कॅम्पमधील घरे यामध्ये गिरणी कामगारांना प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. हे आंदोलन निर्णायक ठरेल, असा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला.

## संपादकीय

# विकासाच्या मार्गांचे तीनतेरा...

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत उभारलेले महामार्ग हे विकासाचे प्रतीक म्हणून सातत्याने मांडले जात आहेत. निवडणुकीच्या काळात तर या महामार्गांचा उल्लेख करून विकासाचा गवगवा करण्यात येतो. रस्ते बांधणे हे निश्चितच आवश्यक आणि स्वागतार्ह आहे; मात्र रस्ते झाले म्हणजे शासनाची जबाबदारी संपली, अशी बेफिकिरीची मानसिकता अधिक चिंताजनक ठरत आहे. महामार्ग म्हणजे केवळ डांबरी पट्टा नव्हे, तर लाखो प्रवाशांच्या सुरक्षिततेची, सोयी-सुविधांची आणि आपत्कालीन व्यवस्थेची जबाबदारी असलेली यंत्रणा आहे. दुर्दैवाने, याच आघाडीवर महाराष्ट्र अपयशी ठरत असल्याचे चित्र मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावर झालेल्या अभूतपूर्व वाहतूक कोंडीने स्पष्ट केले.

मंगळवारी खंडाळा घाटात प्रोपेलीनसारखा अत्यंत ज्वलनशील वायू घेऊन जाणारा टँकर उलटला आणि त्यातून गळती सुरू झाली. परिणामी सहापदरी महामार्गावरील वाहतूक थांबवावी लागली. तब्बल ३५ तास हा महामार्ग ठप्प राहिला, २५ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आणि हजारो प्रवासी अक्षरशः वेठीस धरले गेले.

या कोंडीत रुग्ण, वृद्ध, महिला, लहान मुले, विमानप्रवासी अडकले होते. द्रुतगती महामार्गावर मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने पाणी, अन्न, प्रसाधनगृह यांचा प्रश्न गंभीर झाला. महिलांची कुचंबणा झाली, आजारी प्रवाशांचे हाल झाले.

या महामार्गावरून दररोज सुमारे ७५ हजार वाहने धावतात. १६० किलोमीटर लांबीच्या या रस्त्यावर देशातील सर्वाधिक म्हणजे ३२० रुपये टोल आकारला जातो. त्यात अटल सेतूचा २५० रुपयांचा टोल जोडला गेल्याने प्रवाशांवर मोठा आर्थिक भार पडतो.

इतका टोल भरूनही जर आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांना मूलभूत सुरक्षा आणि सेवा मिळत नसतील, तर हा टोल नेमका कशासाठी, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

या घटनेने आपत्ती व्यवस्थापनातील गंभीर उणिवा उघड केल्या. ज्वलनशील वायूची गळती थांबवण्यासाठी तब्बल २२ तास लागले. तत्काळ प्रतिसाद पथके असली तरी ती केवळ किरकोळ अपघातांपुरती मर्यादित असल्याचे दिसून आले. प्रगत देशांमध्ये अशा महामार्गांवर सुसज्ज ट्रॉमा केअर युनिट्स, विशेष फायर व हॅझमॅट पथके, हेलिकॉप्टरद्वारे एअरलिफ्टची सुविधा उपलब्ध असते. आपल्याकडे मात्र एका ट्रॉमा केअर युनिट आणि मोजक्या हेलिपॅडपुरतीच व्यवस्था आहे. 'अपघात झाल्यास मदत करा' असे फलक लावून जबाबदारी संपत नाही; आपत्तीला तोंड देणारी सक्षम यंत्रणा उभारणे हे खरे व्यवस्थापन कौशल्य आहे.

या वाहतूक कोंडीचे परिणाम केवळ महामार्गापुरते मर्यादित राहिले नाहीत. मुंबई, ठाणे, पुणे या शहरांमध्ये भाजीपाला, दूध यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा जाणवला. म्हणजेच हा महामार्ग राज्याची 'लाईफलाईन' असतानाही एका अपघाताने संपूर्ण यंत्रणा कोलमडली.

आता प्रश्न उरतो तो जबाबदारीचा. कुचकामी प्रशासन, अपुरी आपत्ती व्यवस्थापन प्रणाली की टोल वसूल करून सुविधा न देणाऱ्या कंत्राटदार कंपन्या दोषी कोण ? नेहमीप्रमाणे चौकशीचे आदेश दिले जातील; पण प्रवाशांचा अनुभव पाहता त्यातून फारसे काही साध्य होईल, अशी अपेक्षा नाही. एमएसआरडीसीने मांडलेली दहा पदरी सुपर हायवेची योजना आजही कागदावरच आहे. १४ हजार कोटींच्या खर्चाचे गाजर दाखवले जाते; पण कालबद्ध अंमलबजावणीचा ठोस आराखडा नाही.

प्रवासी टोल द्यायला तयार आहेत, मात्र त्या बदल्यात सुरक्षित आणि सुसज्ज प्रवासाची हमी हवी आहे. केवळ विकासाचे फलक लावून चालणार नाही.

वेळ वाचवण्यासाठी जीव धोक्यात घालणाऱ्या प्रवाशांना आता केवळ सुपर हायवे नव्हे, तर विश्वासार्ह आणि सुरक्षित महामार्गांची नितांत गरज आहे. अन्यथा 'विकासाच्या मार्गां'चे हे तीनतेरा असेच सुरू राहतील.

# उदयदादांनी गड राखला !!
## येळगाव जिल्हा परिषद गटात घड्याळ वाजलं

कराड (वार्ताहर) : येळगाव जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि स्व. विलासकाका उंडाळकर यांचे सुपुत्र उदयसिंह उंडाळकर यांनी तब्बल 4338 इतक्या मतांनी विजय मिळवत आपला बालेकिल्ला कायम राखला. याठिकाणी सख्खे चुलत बंधू ॲड. आनंदराव ऊर्फ राजाभाऊ उंडाळकर यांचा पराभव केला. खरं तर अपक्ष निवडणूक लढलेल्या राजाभाऊ उंडाळकर यांच्यामागे भाजपने ताकद उभी केल्याने निवडणुकीत मोठी रंगत आणली होती. राजाभाऊंच्या खांद्यावर बंदूक ठेऊन भाजपने उदयसिंह उंडाळकर यांच्यावर नेम तर साधला होताच. मात्र उदयसिंह उंडाळकर यांच्या अचूक नियोजनामुळे भाजपचा डाव फसला.

खरं तर सातारा जिल्ह्यातील लक्षवेधी लढतीपैकी एक लढत म्हणून कराड तालुक्यातील येळगाव जिल्हा परिषद गटाकडे पाहिले जाते. मागील वेळी प्रमाणे यावेळीही उंडाळकर बंधूंमध्ये निवडणूक लागल्याने संपूर्ण परिसरात मागील महिन्यापासूनच निवडणुकीचे जोरदार वार होते. अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात असणाऱ्या राजाभाऊंना आमदार डॉ. अतुल भोसले यांच्या भाजपने पाठींबा दिल्याने निवडणूक रंगतदार अवस्थेत होती. आजच्या मतमोजणीत सुद्धा पहिल्या फेरीपासून उदयसिंह उंडाळकर आणि राजाभाऊ उंडाळकर यांच्या अगदीच कमी मतांचा फरक होता. मात्र अखेर उदयदादांनी विजय खेचत आपणच या संपूर्ण भागाचे किंग आहोत ते दाखवून दिले.

उदयसिंह उंडाळकर यांनी काही महिन्यापूर्वीच अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता.

घड्याळ हाती घेतल्यानंतर हि त्यांची पहिलीच वैक्तिक लढाई होती. उदयसिंह उंडाळकर याना या निवडणुकीत शरद पवार गट, काँग्रेस आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेची मोठी साथ मिळाली. दोन्ही राष्ट्रवादी एक झाल्याचा फायदा उदयसिंह उंडाळकर याना झाला. त्यातच आधीपासूनच त्यांनी निवडणुकीची तयारी केल्याने त्यांचा विजय सोप्पा झाला. अतिशय सूक्ष्म निवडणूक नियोजन, युवकांची फळी, विलासकाका उंडाळकर यांच्यावर प्रेम करणारे मूळ निष्ठावान कार्यकर्ते आणि भाजपविरोधी विचाराची लोक उदयसिंह उंडाळकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली. उदयसिंह उंडाळकर यांचे सुपुत्र अधिराज उंडाळकर यांनीही वडिलांच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. युवा वर्गाला एकत्र करत त्यांनी संघटन वाढवण्यात हातभार लावला, गावागावात जाऊन, लोकांमध्ये मिसळत राष्ट्रवादीचे घड्याळ कराड दक्षिणेच्या खेड्यापाड्यात पोहचवले. याचा परिणाम उदयसिंह उंडाळकरांच्या विजयाच्या रूपाने बघायला मिळाला.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, एकात्मिक घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय**
**Email :- integratedmumbai.ee@mahapwd.com**
**दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६**
**ई-निविदा सुचना क्र. ७८ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ (दूरध्वनी क्र. २२०१६९७४/७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता "ब-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स, मुंबई येथील सहा ब्लॉकच्या सेवक निवास इमारतीमधील किरकोळ दैनंदिन दुरुस्ती कामांची वार्षिक देखभाल करणे. | १३९०८०६/- |
| २ | मुंबई येथील सर जे.जे. हॉस्पिटल परिसरातील सहा आर.एम.ओ. क्वार्टर्स इमारत, बी.एम.एस. क्वार्टर्स इमारत, खरेदी विभाग आणि लेडीज रूम, व्यायामशाळा, सार्वजनिक बांधकाम विभाग सेवा केंद्र आणि स्टोअर रूम येथील किरकोळ दैनंदिन दुरुस्ती कामांची वार्षिक देखभाल करणे. | १८३३७९७/- |
| ३ | मुंबई येथील सर जे.जे. हॉस्पिटल परिसरातील सुपरिंटेंडेंट बंगला आणि रेशन दुकानातील किरकोळ दैनंदिन दुरुस्ती कामांची वार्षिक देखभाल करणे. | १७९४१८२/- |
| ४ | मुंबई येथील सर जे.जे. रुग्णालयांच्या समूहातील शारदा इमारतीमधील किरकोळ दैनंदिन दुरुस्ती कामांची वार्षिक देखभाल करणे. | १७६२११४/- |
| ५ | सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स, मुंबई येथील त्वचा, लैंगिक रोग आणि क्षयरोग विभागाच्या इमारतीमधील किरकोळ दैनंदिन दुरुस्ती कामांची वार्षिक देखभाल करणे. | १७२४११८/- |
| ६ | मुंबई येथील सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्समधील ओपीडी इमारतीमधील किरकोळ दैनंदिन दुरुस्ती कामांची वार्षिक देखभाल करणे. | १९८१५३४/- |
| ७ | मुंबई येथील सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्समधील बाई मोतालिबाई इमारतीमधील किरकोळ दैनंदिन दुरुस्ती कामांची वार्षिक देखभाल करणे. | १७३४०८७/- |
| ८ | सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स, मुंबई येथील आर.एम. भट्ट वसतिगृह इमारतीमधील किरकोळ दैनंदिन दुरुस्ती कामांची वार्षिक देखभाल करणे. | १७४०१०६/- |
| ९ | मुंबई येथील सर जे.जे. हॉस्पिटल परिसरातील अपना बॉईज हॉस्टेल इमारतीमधील किरकोळ दैनंदिन दुरुस्ती कामांची वार्षिक देखभाल करणे. | १९८१३८६/- |

**(एकूण ०९ कामे)**

ई-निविदा उपलब्ध कालावधी : **दिनांक १०/०२/२०२६ सकाळी १०.३० पासून ते दिनांक १७/०२/२०२६ रोजी १५.०० पर्यंत**

ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : **दिनांक २०/०२/२०२६ रोजी १५.०५ वाजता**

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. **http://mahapwd.com** २. **http://mahatenders.gov.in**
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र.एघ(सा.बां.)/निविदा/** ९०८६
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४/७६
दिनांक : ५/०२/२०२६

कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.

आरओसी-२०२५-२६/क्र-५/C५६५४

# ‘श्री बाळसिद्धनाथाच्या नावानं चांगभलं!’

## १६ फेब्रुवारीला घोगाव येथे बाळसिद्धनाथ यात्रेला सुरुवात

**कराड :** श्री बाळसिद्धनाथाच्या नावानं चांगभलं... या जयघोषात सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजता गुलाल व खोबऱ्याची उधळण करत वाजत-गाजत श्री बाळसिद्धनाथाची पालखी निघणार आहे. महाशिवरात्रीच्या बार्शीला म्हणजेच माघ अमावस्येला मौजे घोगाव (ता. कराड) येथे श्री बाळसिद्धनाथाची वार्षिक यात्रा भरते.

आटके, शेरे, दुशेरे, घोगावसह परिसरातील गावांचे ग्रामदैवत असलेल्या श्री बाळसिद्धनाथाच्या यात्रेसाठी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. यात्रा कमिटीच्या वतीने यंदा विशेष नियोजन करण्यात आले आहे. १७ फेब्रुवारी रोजी तमाशाचा कार्यक्रम, त्यानंतर भव्य कुस्ती मैदान, १८ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजता ऑर्केस्ट्रा, तर १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे.

यात्रेस येणाऱ्या भाविकांसाठी सर्व सोयी-सुविधांचे उत्तम नियोजन करण्यात आले असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यात्रा कमिटीचे अध्यक्ष डॉ. प्रकाश पाटील यांनी केले आहे.



### संत रोहिदास मंडळाचा संयुक्त जयंती महोत्सव

संत रोहिदास मित्र मंडळाच्या वतीने संयुक्त जयंती उत्सव सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील महाशिवरात्री दिवशी मोठ्या उत्साहात संपन्न होणार असून या उत्सवाला देखील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यावेळी भव्य रक्तदान शिबिर तसेच मंडळाच्या वतीने मुंबई येथे अनेक गोरगरीब रुग्णांना मदत करणारे दापत्य डॉ. अरुण माने व सौ. विद्या माने यांचा सन्मान करण्यात येणार आहे. सोमवारी 16 फेब्रुवारी दिवशी ताई आई चा भंडारा देखील आयोजित केला आहे असे मंडळाचे अध्यक्ष सुभाष गोविंद धुळप यांनी कळवले आहे

# नवी मुंबईच्या महापौरपदी सुजाता पाटील, उपमहापौरपदी दशरथ भगत बिनविरोध



नवी मुंबई (ओमकार धुळप) : नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौरपदासाठी झालेल्या निवडणुकीत सौ. सुजाता सुरज पाटील यांची महापौरपदी तर दशरथ सिताराम भगत यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली. ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी पीठासन अधिकारी म्हणून निवडीची घोषणा करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. सभेच्या सुरुवातीस महापालिका सचिव सौ. संघरत्ना खिल्लारे यांनी पीठासन अधिकाऱ्यांचे स्वागत केले.

महापौरपदासाठी नगरसेविका सरोज पाटील व उपमहापौरपदासाठी नगरसेवक आकाश मढवी यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने दोघांची बिनविरोध निवड झाली. स्थानग्रहणानंतर दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

महापौर सुजाता पाटील यांनी स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण व वाहतूक नियोजनाला प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. उपमहापौर दशरथ भगत यांनी नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी आयुक्त डॉ. कैलास शिंदे, माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. महापौर व उपमहापौर यांनी नंतर राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन त्यांचे देखील आशीर्वाद घेतले. नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त कैलास शिंदे यांनी देखील दोघांचे अभिनंदन केले.

# धारावी पुनर्विकास सर्वेक्षणात मोठा गैरप्रकार?

## बनावट कागदपत्रांद्वारे ५० जणांना घरे लाटल्याचा आरोप



मुंबई : मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्प सुरुवातीपासूनच वादांच्या भोवऱ्यात अडकलेला आहे. आता या प्रकल्पातील पात्रता निश्चिती सर्वेक्षणात मोठ्या गैरप्रकाराचा आरोप समोर आला आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे धारावीत घर नसलेल्या आणि मूळ धारावीकर नसलेल्या सुमारे ५० जणांना पुनर्विकासातील घरे मिळवून दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

धारावीतील माजी आमदार आणि धारावी बचाव आंदोलनाचे समन्वयक बाबूराव माने यांनी यासंदर्भात १० जानेवारी रोजी धारावी पुनर्विकास प्रकल्प (डीआरपी) प्रशासनाकडे लेखी तक्रार केली आहे. या तक्रारीची दखल घेत डीआरपीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकरणासह दोन तहसीलदारांचा समावेश असलेली त्रिसदस्यीय चौकशी समिती स्थापन केली आहे. मात्र अद्याप या समितीचा अहवाल सादर झालेला नाही.

सध्या धारावीकरांना धारावीतच, तर अपात्र धारावीकरांना धारावीबाहेर घरे देण्यासाठी डीआरपी आणि नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडकडून सर्वेक्षण सुरू आहे. तसेच परिशिष्ट-२ अंतिम करून त्याची यादी जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू असतानाच शताब्दीनगर येथील परिशिष्ट-२ मध्ये गैरप्रकार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

माने यांच्या म्हणण्यानुसार, अस्तित्वात नसलेल्या घरांचे क्रमांक दाखवून, मूळ घराला जोडून बनावट घरे दाखवण्यात आली. यामध्ये काही लाभार्थ्यांना सेक्टर-५ मधील म्हाडाच्या इमारतीत घरे वितरितही करण्यात आली असून, तक्रारीनंतर पुढील वितरण थांबविण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणामुळे मूळ धारावीकरांच्या हक्कांवर गदा येत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

दरम्यान, याबाबत डीआरपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

**बाबूराव माने काय म्हणाले,**

**“मूळ धारावीकरांना अपात्र ठरवून धारावीबाहेर हुसकावायचे आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे बाहेरील लोकांच्या नावे घरे लाटायची असा प्रकार सुरू आहे. हा अत्यंत गंभीर आर्थिक गैरप्रकार आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाची व फौजदारी कारवाई झाली पाहिजे. मूळ धारावीकरांचा न्यायहक्क अबाधित ठेवण्यासाठी पात्रता निश्चितीची प्रक्रिया अधिक पारदर्शक करणे अत्यावश्यक आहे.”**

**- बाबूराव माने,**
**माजी आमदार व तक्रारदार**

# कुर्ला–ट्रॉम्बे मार्गावरील ३१५४ झोपड्यांचे पाडकाम थांबवा;

## खासदार वर्षा गायकवाड यांची रेल्वेमंत्र्यांकडे मागणी



प्रतिनिधी : रेल्वे प्रशासनाने कुर्ला–ट्रॉम्बे मार्गालगतच्या ३१५४ झोपड्यांचे पाडकाम करण्यासाठी २७ जानेवारी २०२६ रोजी नोटीस बजावली असून १० ते १२ फेब्रुवारी दरम्यान कारवाई प्रस्तावित आहे. या नोटीसीमुळे रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. ही पाडकाम मोहीम तात्काळ रद्द करून बाधित कुटुंबांसाठी कायमस्वरूपी पुनर्वसन योजना लागू करावी, अशी मागणी मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्राद्वारे केली आहे.

पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, सदर वस्ती दोन दशकांहून अधिक काळापासून अस्तित्वात असून हजारो गरीब व कष्टकरी कुटुंबांचे ते घर आहे. यापूर्वी न्यायालयीन व लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपामुळे पाडकाम पुढे ढकलण्यात आले होते.

केवळ सहा दिवसांची सूचना देऊन इतक्या मोठ्या प्रमाणावर पाडकाम करणे अमानवी असून हजारो कुटुंबे बेघर होतील. त्यामुळे या प्रकरणात मानवी व सर्वसमावेशक दृष्टिकोनातून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई (सा.बां) विभाग, गणपत जाधव मार्ग,**
**वरळी, मुंबई - ४०० ०१८.**

Email :- centralmumbai.ee@mahapwd.gov.in ☎ ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स २४९३१९०२
जा.क्र. का.अ./ममुंवि/निविदा/ ५२८ दिनांक :- ०५/०२/२०२६

**ई निविदा सूचना क्रमांक ३३ सन (२०२५-२६)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील **मजूर सहकारी संस्था मर्यादित यांचेकडून** ०२ कामांची ई-निविदा http://mahatenders.gov.in/http://mahapwd.gov.in मागवित आहेत. सर्व मजूर सहकारी संस्थां,मुंबई जिल्हा यांनी प्रचलित नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| | |
|---|---|
| **ई-निविदा उपलब्ध कालावधी -** | दि.१०.०२.२०२६, सकाळी १५.०० पासून ते दि.१७.०२.२०२६ रोजी १५.०० पर्यंत |
| **ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास)** | दि.१८.०२.२०२६ रोजी १५.०० वाजता (कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, यांचे कार्यालय, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ४०००१८) |

**कार्यकारी अभियंता,**
**मध्य मुंबई (सा.बां) विभाग,**
**वरळी, मुंबई.**

आरओसी-२०२५-२६/क्र-५/C५६४८

# चर्मकार समाजाच्या सर्व मागण्या तातडीने मार्गी लावू – मंत्री मंगल प्रभात लोढा

## संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती महोत्सवाचा ऐतिहासिक शुभारंभ

**मुंबई : चर्मकार समाजाच्या सर्व प्रलंबित मागण्या येत्या वर्षभरात मार्गी लावण्यात येतील, असे आश्वासन कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोपक्रम मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिले. माघ पोर्णिमेनिमित्त संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या ६५० व्या जयंती महोत्सवाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. दादर येथील राजा शिवाजी विद्यालयाच्या पटांगणात हा भव्य आणि ऐतिहासिक सोहळा पार पडला.**



छायाचित्रात डावीकडून चर्मकार समाजाला संबोधित मंत्री मंगल प्रभात लोढा, समितीचे रविंद्र डोईफोडे, देवराम केदार, मनोहर खैरे, मयूर देवळेकर, ज्ञानेश्वर ठोंबरे, विष्णू वझे, ह.भ.प. शिवाजीराव मोरे महराज, विजय इंगळे, धनंजय वायंगणकर, नवनाथ शिंदे, गुरुदेव कांबळे, हृदयनाथ खंदारे, गोविंद खरटमोल दिसत आहेत

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेल्या मंत्री लोढा यांनी सांगितले की, चर्मकार समाजाच्या शिष्टमंडळाने सादर केलेल्या सर्व मागण्यांकडे शासन सकारात्मक दृष्टीने पाहत असून त्यांची पूर्तता प्राधान्याने केली जाईल. संत रोहिदास महाराजांनी समता, भक्ती आणि संस्कृतीचे रक्षण केले, त्यांच्या विचारांचे स्मरण ठेवणे ही काळाची गरज आहे, असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाला संत तुकाराम महाराजांचे दहावे वंशज ह.भ.प. शिवाजीराव मोरे महाराज, स्वामी विज्ञानानंद, मुंबई महानगर सहसंघचालक प्रा. डॉ. विष्णू वझे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ह.भ.प. मोरे महाराज यांनी संत रोहिदास महाराजांच्या पर्यावरण रक्षणाच्या संदेशावर प्रकाश टाकत प्रत्येकाने चिंचेचे एक रोप लावावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस पोवाडे, कविता सादरीकरण, शोभायात्रा व चित्रप्रदर्शनाने उपस्थितांचे लक्ष वेधले. मोठ्या संख्येने चर्मकार बांधव, भगिनी व आजी-माजी लोकप्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताने झाला.

# वरळीत भक्तिभावात साजरा झाला श्री काळभैरवनाथांचा भंडारा उत्सव

प्रतिनिधी : वरळी येथे श्री काळभैरवनाथांचा सालाबादप्रमाणे होणारा भंडारा उत्सव रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी अत्यंत भक्तिभावात आणि उत्साहात संपन्न झाला. "कोणी रंक असो वा राव, हृदयी धरूनी भाव" या भावपूर्ण प्रार्थनेप्रमाणे काळभैरवाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.




या पवित्र उत्सवात श्री काळभैरवनाथांची विधिवत पूजा-अर्चा, आरती व धार्मिक विधी पार पडले. चंद्र, सूर्य व अग्नीचे तेज धारण करणाऱ्या काळभैरवाच्या दर्शनाने भाविक भारावून गेले होते. त्रिशूळधारी, संकटी धावून येणाऱ्या प्रभूच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

उत्सवाच्या निमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सर्व स्तरातील भाविकांनी एकत्र येत महाप्रसादाचा लाभ घेतला. अत्यंत शिस्तबद्ध आणि सुंदर पद्धतीने हा उत्सव आयोजित करण्यात आला होता. आयोजकांच्या नियोजनबद्ध व्यवस्थेमुळे कार्यक्रम सुरळीत पार पडला. या भक्तिमय सोहळ्याने वरळी परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

# राष्ट्रीय खो-खो पटू सुनिल लाड यांची मुंबई महानगरपालिकेत प्रमुख अधिकारी (प्र) म्हणून नियुक्ती!



**मुंबई :** राष्ट्रीय खो-खो पटू तथा क्रीडा प्रसारक श्री. सुनिल लाड यांची मुंबई महानगरपालिकेच्या दुकाने व आस्थापना विभागाचे प्रमुख अधिकारी (प्र) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

श्री. लाड हे डॉ. शिरोडकर हायस्कूल व महर्षी दयानंद कॉलेजचे विद्यार्थी असून, युवक क्रीडा मंडळ, परळ या संघातर्फे त्यांनी अनेक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे. आंतरविद्यापीठीय स्पर्धांमध्ये त्यांनी १९८६ ते १९८९ या कालावधीत सलग चार वेळा मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी बजावली.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल करत त्यांनी बी.कॉम., एम.ए. व एल.एल.एम. अशी उच्चशिक्षणाची पदवी संपादन केली आहे. कोकण व मुंबईतील विविध शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध असून सामाजिक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

दुकाने व आस्थापना विभागात कार्यरत असताना त्यांनी प्रतिबंधित प्लास्टिकच्या वापराविरोधात प्रभावी जनजागृती केली. यासाठी त्यांनी अनेक शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था तसेच व्यापारी संघटनांच्या सहकार्याने नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व प्रभावीपणे पटवून दिले. कोविड-१९ महामारीच्या काळात त्यांनी बजावलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत, मुंबई महानगरपालिकेतर्फे त्यांचा विशेष गौरव करण्यात आला होता. त्यांच्या या नियुक्तीबद्दल विविध क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा मुंबईत पदाधिकारी निवड मेळावा १७ फेब्रुवारीला

**मुंबई :** राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा पदाधिकारी निवड मेळावा मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता कांदिवली (प.) येथील हर्ष सभागृह, चारकोप येथे आयोजित करण्यात आला आहे. महापालिका निवडणुकांमुळे रद्द झालेला हा मेळावा महासंघाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, माजी समाजकल्याण मंत्री मा. श्री. बबनराव (नाना) घोलप यांच्या आशीर्वादाने तसेच राष्ट्रीय सल्लागार मा. श्री. पंढरीनाथ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राष्ट्रीय महिला अध्यक्षा श्रीम. सरोज बिसुरे ताई यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

या मेळाव्यात मुंबईतील सध्याच्या कार्यकारिणीचा आढावा घेण्यात येणार असून नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, संघटन बांधणी तसेच गटई चर्मकार बांधवांच्या विविध समस्या व मागण्यांवर सविस्तर चर्चा करून योग्य निर्णय घेतले जाणार आहेत. तसेच राष्ट्रीय उपाध्यक्ष मा. श्री. अर्जुन वाघमारे यांचा ७५ वा अमृतमहोत्सवी वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे. यावेळी चर्मकार समाजातील नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविकांचा जाहीर सत्कारही होणार आहे.

समाजकार्य करू इच्छिणाऱ्या बांधवांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# एक देश एक परवान्यामुळे शेतकऱ्यांना दर्जेदार खते मिळणार

**मुंबई / रमेश औताडे : सध्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये खत विक्रीसाठी वेगवेगळे परवाने घ्यावे लागतात. त्यामुळे कंपन्यांना अडचणी येतात आणि त्याचा फटका अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांनाच बसतो. एकच राष्ट्रीय परवाना प्रणाली लागू झाल्यास देशभर एकसारखी, दर्जेदार आणि योग्य दरातील खते शेतकऱ्यांना सहज मिळू शकतील.**

शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात घट होऊन पीक उत्पादन वाढावे, यासाठी खत व सूक्ष्म पोषक तत्त्वांच्या धोरणात बदल होणे गरजेचे असल्याचे मत परिषदेत व्यक्त करण्यात आले. ५ व ६ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईतील नॅशनल स्टॉक एक्स्चेंज येथे ही दोन दिवसांची परिषद झाली.

परिषदेत बोलताना भारत सरकारचे कृषी आयुक्त डॉ. पी. के. सिंह यांनी सांगितले की, शेतीची खरी ताकद माती, पीक आणि शेतकरी यांच्यात आहे. माती निरोगी नसेल तर उत्पादन वाढणार नाही. त्यामुळे संतुलित खत वापर आणि एकात्मिक पोषण व्यवस्थापन शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र शासनाचे मंत्री जयकुमार जितेंद्रसिंह रावल यांनी सांगितले की, सूक्ष्म खतांनी गेल्या अनेक वर्षांत पीक उत्पादन आणि गुणवत्तेत मोठी भर घातली आहे. शेतकरी, खत उत्पादक, बियाणे उद्योग आणि प्रक्रिया उद्योग यांनी एकत्र काम केल्यास शेती अधिक फायदेशीर होईल.

सूक्ष्म खते, जैविक खते आणि विशेष खतांना जलद मंजुरी बनावट व निकृष्ट खते विकणाऱ्यांवर कडक कारवाई चांगल्या दर्जाच्या भारतीय खतांच्या निर्यातीला प्रोत्साहन नियम सोपे करून शेतकऱ्यांपर्यंत नव्या तंत्रज्ञानाचे फायदे पोहोचवणे एकूणच, या शिखर परिषदेत शेतकऱ्यांना योग्य खत, योग्य वेळी आणि योग्य दरात मिळावे, तसेच शेती शाश्वत व फायदेशीर व्हावी, यासाठी सरकार आणि उद्योगांनी एकत्र काम करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

Printed and published by Bhimrao Hindurao Dhulap, Printed at Plaskot Industries, 23, Municipal Indl. Estate, K. K. Marg, Satrasta, Mumbai -400 011 and published at C/66, Mukuda Nagar, A-Ward, Laxmi Mandir, Dharavi, Mumbai - 400 017. Editor : Bhimrao Hindurao Dhulap, Mob. 9221117684
Any litigation against the content will be entertained under the jurisdiction of Mumbai only.

हे साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक, मालक श्री. भिमराव हिंदुराव धुळप यांनी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीयल इस्टेट, के. के. मार्ग, सातरस्ता, मुंबई -४०० ०११ येथून छापून सी/६६ मुकुंदनगर, ए/ वॉर्ड, लक्ष्मी मंदिर, धारावी, मुंबई - ४०० ०१७ येथून प्रकाशित केले. संपादक : भिमराव हिंदुराव धुळप. मो. ९२२१११७६८४
(प्रकाशित बातम्या / लेखांशी सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद मुंबई न्यायकक्षेत)